

सं. वाचनालय, ठाणे

IRBK-0116108

१६२०८.
१५७०५
बा.पा.

'गुण' संग्राहक-माला : पुष्प २ रें

# कहाणी जसमाची

लेखक

श्री. वि. य. कुलकर्णी

IRBK-0116108
IRBK-0116108

मूल्य : दीड रुपया

१९७४

# प्रकाशकाचा हेतु

भारतीय संस्कृति ही उज्वल आहे. संस्कृतीचा आविष्कार ह्या उत्तमोत्तम गुणांच्या द्वारें होत असतो. असे विविध गुण दाखविणारे साहित्य प्रकाशित करणें, हाच आमचा हेतु. ह्या कथेंत,' सत्ताधीश'ही 'व्यक्ति' नसते. तो 'समाज' असतो. सत्ताधिशानें नीति जर धाब्यावर बसविली तर काय घडतें, तें ही कथा वाचा म्हणजे तुम्हांस कळेल.

दत्तजयन्ती : शके १८९६<br>
दिनांक : २८-१२-१९७४

— प्रकाशक

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति : सन १९७४

मुद्रक :<br>
न. शं. कुलकर्णी<br>
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,<br>
स. नं. ७२०चा २०,<br>
नवी पेठ, पुणें ३०

प्रकाशक :<br>
न. शं. कुलकर्णी<br>
जयन्त आणि कंपनी,<br>
स. नं. २७० चा २०,<br>
नवी पेठ, पुणें ३०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...९२१०८ नों. दि



# कहाणी जसमाची

एक आटपाट नगर होतं. नगराचं नाव होतं पाटण. पाटण म्हणजे गुजरातमधलं. या पाटणला एक मोठा तलाव आहे. तलाव आहे पण पाणीच नाही त्याला. या तलावाच्या भोवती शंकराची छोटी-छोटी मंदिरं आहेत. सहस्र मंदिरं! म्हणून या तलावाचं नाव आहे 'सहस्रलिंग तलाव.' या तलावाकाठी एका सतीचं मंदिर आहे. सती जसमाचं मंदिर! गुजराती स्त्रिया या सतीला नवस करतात. दर्शनाला तर रोज गर्दीअसते. जसमाच्या नावाचा जयजयकार रोज सकाळ-संध्याकाळ घुमतो.

कोण ही जसमा? तिचं मंदिर का उभारलं आहे? ते या तळ्याच्या काठी का? – आणि विशेष म्हणजे या तळ्याला पाणी का नाही? ही सारीच कहाणी ऐकण्यासारखी आहे. सती जसमाची कहाणी खरी घडलेली आहे; पण केव्हा ते मात्र इतिहास नीटसं सांगत नाही.

शेकडो वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी पाटण राजधानीच शहर होतं. सोळंकी घराण्याचं राज्य होतं. कुणी म्हणतात, ही

कहाणी घडली तेव्हा जयसिंह राजा होता. कुणी म्हणतात सिद्ध-राज! बहुधा सिद्धराज राजा असेल !

सिद्धराज मोठा कल्पक राजा होता. चतुर होता. गुणी होता. प्रजाहितदक्ष होता.

एकदा भीषण दुष्काळ पडला. आषाढात मेघगर्जना झालीच नाही. श्रावणात रिमझिम पाऊस बरसला नाही. नदी-नाल्यांना पूर आले नाहीत. डोंगरमाथे जलधारात न्हाले नाहीत. शेतांवर अमृत-वर्षाव झाला नाही. पेरलेली धान्यं करपून गेली. डोंगर उघडे–बोडके दिसू लागले. नदीनाल्यातले गोटे वर आले. झरे आटले. छोटचा विहिरी आटल्या. लोकांना पाण्यासाठी भांडी घेऊन दूर-दूर जावं लागलं.

राजा सिद्धराज अस्वस्थ झाला. माझ्या प्रजेला हाल भोगावे लागतात. गावोगावच्या वार्ता येतात. गावोगावची कहाणी न्यारी ! काय करावं ? त्या करुण कहाण्यांनी मन द्रवलं.

राजानं मग धान्याची सरकारी कोठारं मोकळी केली. गावोगाव दुष्काळी कामं काढली. लोक श्रमू लागले, खपू लागले. रोज मिळणाऱ्या मजुरीवर आला दिवस ढकलू लागले.

सिद्धराजाच्या मनात आलं, आपल्या पाटणलाही मोठं काम काढलं पाहिजे. त्यानं मंत्रिमंडळाला बोलावलं. सर्वांनी विचार-विनिमय केला. ठरलं की पाटणसाठी मोठा तलाव बांधावा. असंही ठरलं की, त्या तलावाभोवती 'सहस्रलिंगं' असावी. तलावाचं नावच मुळी ठेवावं 'सहस्रलिंग तलाव !' म्हणजे पाण्याची सोयही होईल आणि ईश्वराची पूजाही !

महाअमात्य मुंजाल होता. त्यानं म्हटलं, ' महाराज, एवढ्या मोठ्या कामाला ओड जातीचे मजूरच हवेत. तेच ही कामं करू जाणे ! ओड जाती दगडांच्या व मातीच्या कामासाठी प्रसिद्ध आहेत. तर माळव्यातून असे मजूर आणायला हवेत !'

सिद्धराजानं म्हटलं,' महाअमात्य, तर मग ती सारी व्यवस्था आपणच करा. आणि सारी व्यवस्था होताच आम्हाला कळवा.'

त्याप्रमाणं मुंजाल कामाला लागला. माळव्यात मुद्दाम माणूस पाठवून त्यानं त्यांच्या प्रमुखाला बोलावून घेतलं. काम केवढं आहे, किती मुदतीचं आहे, याचा विचार करून प्रमुखानं तितके मजूर आणायचं आश्वासन दिलं.

एके दिवशी ओड मजुरांचा पाटणच्या बाहेर तळ पडला. त्यांच्या छोट्या छोट्या झोपड्या उभारल्या गेल्या. मजुरांचा प्रमुख त्रिकम होता. तो प्रथम मुंजालला भेटला, त्यानं काम समजावून घेतलं, आणि दुसऱ्याच दिवशी सूर्योदयाला काम सुरू झालं.

महाअमात्य मुंजाल यानं राजाला सांगितलं. सिद्धराजाला वाटलं स्वत: काम पाहून यावं, तो निघाला. काम चाललं होतं तिथं आला. झाडाखाली उभा राहिला. पाहू लागला.

त्रिकम एका बाजूला होता. महाअमात्यांनी त्याची ओळख करून दिली होती. राजानं स्वत:च त्याला कामाचं स्वरूप सांगितलं होतं. त्याची चौकशी केली होती. तो मुकादम होता. तो उभा होता. आज्ञा सोडत होता. शेकडो कुदळी चालल्या होत्या. शेकडो घमेली मातीनं भरत होती. आणि घमेली ओड-स्त्रिया उचलून दूर नेत होत्या. त्यांची एक रांग लागली होती.

पलीकडं पुष्कळ झोपड्या होत्या. एक झोपडी थोडी बाजूला होती. सिद्धराजानं ओळखलं की, ही त्रिकमची झोपडी! झाडा-झाडांना झुले बांधले होते. त्यात मजुरांची मुलं झोपली असतील. त्यांचीच थोडी मोठी मुलं त्यांना झुलवीत, खेळवीत होती.

तेवढ्यात त्रिकम ओरडला, 'जसमा, – अरी ओ जसमा, गाएगी नहीं ?'

स्त्रियांच्या रांगेतून कुठूनतरी बारीक आवाज किणकिणला, 'जी–'

आणि ओड-भाषेतलं गाणं सुरू झालं. 'जसमा' एक एक ओळ सांगत होती. स्त्रिया नंतर म्हणत होत्या, त्या स्वरांवर काम सुरू झालं. काम हलकं वाटू लागलं. वेग वाढला. मातीच्या टोपल्या घेण्यात, उचलण्यात, नेण्यात आपोआप मजेशीर लय-बद्धता आली. सिद्धराजाला त्या गाण्यातला गोडवा फक्त कळला; पण कसलं गाणं होतं कोण जाणे. आणि ते स्वर येतात कुठून ? ही जसमा आहे तरी कुठं ? एवढ्या स्त्रियांच्या रांगेत ती कुठंतरी असेल! –असेल. करायचं काय आपल्याला ?

सिद्धराज राजमंदिरी आला. इतर सारी कामं झाली. आपल्या शयनमंदिरात आला; पण त्याच्या कानात अजून ती सनई वाजत होती.

दुसरे दिवशी राजानं उभं रहायची जागा बदलली. जणू सहज–पण खरं म्हणजे जसमाला बघायला.

काम केव्हाच सुरू झालं होतं. सिद्धराज एका झाडाखाली एका भल्या मोठ्या धोंड्यावर एक पाय ठेवून अन् कमरेवर एक हात ठेवून उभा होता. स्वतः महाराज कामावर देखरेख

करताहेत असं सर्वांना वाटलं. तसं त्याला स्वत:लाही वाटत होतं. ‘ आपण काम पहायला आलो आहोत, ’ असं तो मनाला बजावीत होता; पण डोळे भिरभिरत होते. जसमा कोण ते बघायला उत्सुक होते !

आता या झाडाजवळून ती स्त्रियांची रांग जात होती. अगदी थोड्या वेळानं त्रिकम ओरडलाच, ‘ अरी ओ जसमा, गाएगी नही ? ’

आणि दुरून एक तान गार वाऱ्याच्या लहरीसारखी फिरली. राजा न्याहाळू लागला. स्वर जवळ-जवळ आले. झाडापासून अगदी थोड्या अंतरावर अन् –

सिद्धराज खरोखर चकित झाला. काय ही जसमा ? ही ? ही मजूर स्त्री आहे ? जसमाच्या डोकीवर टोपली आहे. हात-पाय मातीनं भरले आहेत म्हणून काय झालं ?

सारी रांग समोरून येत होती. सिद्धराज पहात होता. कामा-वर लक्ष ठेवायला स्वत: महाराज उभे आहेत, एवढीच त्यांची कल्पना. ती आपल्या कामात मग्न होती. जसमाचं लक्ष नव्हतं. पण राजाचं ध्यान खेचलं गेलं.

जसमा अठरा-वीस वर्षांचीच होती. गोरीपान होती. उन्हात काम करीत असल्यानं तिचे गाल लालबुंद झाले होते. केसांच्या बटा गालावर आल्या होत्या. डोळे काळेभोर होते. हरिणी-सारखे. आणि मेहनतीच्या कामानं आरोग्य नांदत होतं. ती रसरशीत होती. सकाळच्या किरणांसारखी तिची कांती होती. उन्हाळ्यातल्या आकाशासारखी निळी झाक तिच्या डोळ्यात

होती. डाळिंबाच्या कळीसारखे तिचे ओठ होते. यौवनाचा अवखळपणा आणि जानपदाचा निष्पापपणा एक झाला होता.

सिद्धराज पहात राहिला. तिचं लक्ष नव्हतं. तिचं लक्ष नव्हतं हेच बरं. राजा एकटक पाहात आहे, हे तिला कळत नव्हतं. कुणालाच कळत नव्हतं.

सिद्धराज राजमंदिरी आला. आज शयनमंदिरी त्याला झोप येईना. स्वरांनी वेड लावलं होतं. आज स्वरांच्या जोडीला सौंदर्यही होतं. डोळे मिटले अगर उघडे ठेवले तरी त्याला जसमाच दिसू लागली.

जसमा ! जसमा ! !

त्याला सुचेना. त्याचा दिनक्रमच झाला. झाडाखाली उभं राहावं. राजे स्वतः कामावर देखरेख करतात, म्हणून महामंत्र्यांनी आसनाचीही सोय केली. गार पाण्याचे रांजण झाडाखाली ठेवले. – राजांची उत्कृष्ट व्यवस्था झाली. राजे सर्व कामावर थोडीच देखरेख करीत होते ? त्यांची नजर फक्त जसमावर होती.

जसमाचं काम सुरू झालं.

किती घंटे गेले कुणास ठाऊक !

सूर्य वर चढत होता. मातीचा ढिगारा उंच होत होता. तलावाची खोली वाढत होती.

एवढ्यात जसमानं डोकीवरची पाटी खाली ठेवली. ती खाली वाकली. कुणीतरी तिला विचारलं, ‘ क्या है री ?’

‘ निगौडा काँटा ! ’

‘ उधर छाँवमे जा ! ’

‘ छी: ! – महाराज है री – ’

सिद्धराजानं पाहिलं. ती तिथंच उन्हात बसली. त्यानं एका सेवकाला सांगितलं, ‘ तिला म्हणावं, इथं सावलीत ये. ’

जसमा सावलीत आली. ती घामानं डबडबली होती. सावलीत तिला बरं वाटलं. राजानं सेवकाला म्हटलं, ‘ तिला पाणी दे प्यायला. ’

त्याबरोबर जसमानं राजाकडं पाहिलं. ती खुदकन् हसली.

सिद्धराजाच्या साऱ्या अंगातून एक अनामिक लहर सळसळत गेली. त्याला तिच्याशी बोलायचं होतं. खूप-खूप बोलायचं होतं; पण काय बोलायचं होतं ? ते कुठं त्याचं त्याला ठाऊक होतं ? अनेक शब्द हृदयात धडपडून उठत होते. लटपटून पडत होते. ओठापर्यंत कुणीच यायला तयार नव्हतं.

शेवटी त्यानं एवढंच म्हटलं, ‘ जसमाऽऽ, – जी ! ’

‘ तुझं नाव जसमा आहे ? ’

राजाला स्वतःच्या प्रश्नाचं स्वतःलाच हसू आलं. जसमाही हसली. मोठी गोड हसली. ‘ जी– ’

‘ तू – ’

‘ वे हमारे मुखिया है न उनकी धरमपत्नी हूँ. ’ तिनं उत्तर दिलं.

सिद्धराज काही बोलला नाही ; पण त्याला ते उत्तर आवडलं नाही. हिचं लग्न झालं आहे, हे त्याला ऐकायचं नव्हतं. तो काही बोलला नाही.

सायंकाळी सिद्धराज आपल्या महालात गेला. तो पुनः पुनः ते शब्द उच्चारीत होता. खरोखर त्याला ते नको होते. ते शब्द

विसरायचे होते; पण मधमाशीसारखे ते कानाशी गुंजत राहिले होते. ' वह मुखिया है न–उसकी मै धरमपत्नी हूँ ! '–छे: ! हे कशाला सांगायचं तिनं ?

मुखियाची धर्मपत्नी जसमा ! छे:! छे: ! ती त्या रानवटाला शोभते तरी ? ही नाजूक जाईची वेल रानटी झाडावर वाढावी ? त्याला तिनं वेढावं ?

अन् त्याच्या मनात आलं, ' जसमा राणी शोभेल ! '

खरंच ! राणी शोभेल ! त्या कल्पनेनं तो सुखावला. जसमा आपली राणी व्हायला हवी होती !

– हवी होती !

– पण आता –

– अजूनही अशक्य काय ?

– तिला काय राजवैभव नकोसं वाटेल ?

– सुख ! विलास ! नकोसे वाटतील ?

– विचारलं पाहिजे.

– हूँ ! विचारायचाच अवकाश. ही गोंडस रानकिशोरी त्या त्रिकमचा हात झटकून आपल्या आश्रयाला येईल ! झोपडीतून राजमहालात !

– राजमहालातच शोभणारं हे सौंदर्य आहे ! दुसरे दिवशी सिद्धराज आपल्या जागी जाऊन बसला. आज त्यानं नोकराचाकरांनाही पाठवून दिलं. एकटाच बसला. त्याला वाटत होतं जसमा पाहील, हसेल, पण–

जसमाचं काम संथपणे शांतपणे चालू होतं. ती महाराजांकडं कशाला पाहील ? –पण महाराज पहात होते. तिनं आपणा-

कडं दृष्टीक्षेप टाकावा म्हणून नाना प्रकार करीत होते; पण काही उपयोग होत नव्हता. शेवटी त्यांनी सरळ हाक मारली. ' जसमा, – '

त्यांनी खूण केली. जसमानं मातीचीं पाटी खाली ठेवली नि ती निःसंकोच समोर येऊन उभी राहिली.

' जसमा,– '

' जी – '

सिद्धराजाच्या मनात आलं, कुठून आरंभ करावा ?

... अन् सुचलं ! –

' काल काटा मोडला होता नं ! आज पाय कसा आहे ? '

' बरा आहे, महाराज. '

' तू तर पाय नीट टेकत नाहीस ! '

' थोडा दुखतो आहे. '

' मग ? तरी काम करतेस ? '

जसमानं आश्चर्यानं पाहिलं !

–अहाहा ! काय भावपूर्ण डोळे ?–नुसत्या दुरून पापण्या हलतात तर अंगावरून मोरपिसं फिरल्यासारखा गोड शहारा येतोय ! पण हे आपलं मनात येतंय ! बोलायचं कसं ?...

' जसमा, त्रिकमला माहिती आहे ना तुझा पाय दुखतो ते.'

' जी. '

' मग तरीही त्यानं तुला कामाला जुंपलं ? इतका दुष्ट आहे तो ? '

जसमाचे डोळे पाणावले. ' असं म्हणू नका सरकार ! – त्यांचा माझ्यावर फार जीव आहे ' जसमा थोडं बोलायचं

थांबली. नंतर हळूच म्हणाली, 'काल त्यांनी स्वतः काटा काढला.' ... आणि जसमा अशी काही लाजली –

'छे ! छे ! ते काही खरं नाही. तू आज काम करू शकली नसतीस म्हणून त्यानं काटा काढला. तुझ्यावर त्याचं प्रेम दिसत नाही– '

सिद्धराजानं हळूच विष पेरलं. जसमा काहीच बोलली नाही. सिद्धराजानं पुनः म्हटलं, 'मी म्हणतो ते खरं ना ? '

जसमा हळूच म्हणाली, 'आपको क्या मालूम वे मुझको कितने चाहते है ? ... उनका प्यार भूला नहीं जा सकता !'

'शी ! हे काय प्रेम ? तुझ्यासारख्या नाजूक फुलराणीला पाणी वाहायला लावायचं ? '

'सरकार, पोटाचा धंदा करायला नको का ? मग खायचं काय ?'

'माझ्यासारख्यानं नसतं तुला हे काम करू दिलं !' राजानं म्हटलं.

'– पण मला ही बसून मिळालेली भाकर पचली नसती !' असं म्हणून जसमा निघून गेली.

दुसऱ्या दिवशी राजानं तिला पुनः बोलावून घेतलं अन् विचारलं, 'जसमा, त्रिकमला तू काही सांगितलंस ? '

'जी ! '

'सांगितलंस ? '

'जी. आम्हा दोघात लपवून ठेवण्यासारखं काय आहे ?–'

'मग तो काय म्हणाला ? '

'सरकार म्हणत असतील तर बैस तू ! '

‘ हो ना ? – मग बैस. ’

‘ पण मला नाही बरं वाटत. ’

‘ का ? ’

‘ त्यांनी उन्हात खपायचं नि मी सावलीत बसायचं ? अरशिन विसरायची ? ’

‘ अरशिन ? म्हणजे ? ’

‘ अरशिन म्हणजे तुमची हळद ! ’

‘ जसमा, हळद तू विसरत नाहीस; पण तो ? तो तुला एक मोलकरीण समजतो, किती राबवतो ! हे तुझं सौंदर्य का माती वाहायचं आहे ! तू राणी होऊ शकशील राणी ! ’

राजानं हे शब्द विशेष जोर देऊन उच्चारले. अन् त्यानं जसमाकडं साभिप्राय पाहिलं; पण ती काही बोलली नाही. तिनं मान खाली घातली.

राजाला वाटलं ती लाजली असेल. तिला कदाचित आपल्या शब्दांचा ‘ योग्य तेवढा ’ अर्थ कळला नसेल ! तेव्हा तो म्हणाला,

‘ तुझे डोळे मला फार-फार आवडतात, आणि तुझे ओठ तुझ्याइतकी सुंदर मुलगी मी कुठं पाहिली नाही – ’

जसमा हसली आणि म्हणाली, ‘ हे सुद्धा असंच म्हणतात ! ’

सिद्धराजाच्या उतू जाणाऱ्या भावनेमध्ये एकदम गार पाणी पडलं. त्यानं पुन: स्वतःला सावरलं, ‘ त्याला काय तुझं सौंदर्य कळणार ? रानवट तो ! ’

जसमाला थोडा रागच आला. तिनं म्हटलं, ‘ रानातलेच ते. रानवटच असायचे, जातीवंत नाग आहेत ते ! ’

'तेच मी म्हणतो ... जातीवंत नाग तो. विषारी. तुझ्या-सारख्या –'

'महाराज, ते नाग तर मी नागिण ! नाग-नागिणीचं जोडपं रानवटच असायचं असं म्हणते मी ! '

'तुला काय म्हणायचंय ?' सिद्धराजाही थोडा कठोर झाला.

'काही नाही महाराज ! नाग-नागिण प्रेमात आले की डोलतात, नाचतात. रानातलं प्रेम रानवट असायचं. दुरून पाहाण्यातच मजा ! '

'जसमा, तू काय सांगते आहेस ? – मला – एका राजाला ? पण तुझ्यावर आम्हाला रागावता येत नाही. तुला कळत नाही. तू केवढं सुख लाथाडते आहेस ते ! – बघ, मनात आणशील तर तू राजमंदिरात राहू शकशील ! तू एकदा नुसतं राजमंदिर पहा. मग मला सांग. चलशील राजमंदिरात ? – '

जसमानं विचारलं, 'काय असतं तिथं ?' ... किती भोळी ! विचारतेय राजवाड्यात काय असतं ! .. काय काय सांगायचं ? गाद्या ? गालिचे ? –' सिंहासन ? नोकर-चाकर ? खान-पान ? मोठेमोठे महाल ? ते आरसे ? तो साजशृंगार ? उंची वस्त्रं ? अलंकार ? पण प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय हे कळणार कसं ?

'तू एकदा येऊन तर पाहशील ? ' त्यानं म्हटलं. त्याची आशा पालवली होती.

'जी ! कुठं यायचं ? '

'राजवाड्यात ! तू माझी राणी होशील ! '

'महाराज, आपल्याला राणी आहे ना ? '

सिद्धराजाच्या मनात आलं, 'काय वेडी मुलगी आहे ही !

भलत्यावेळी भलती आठवण ! त्यानं हळूच म्हटलं, ‘ हो आहे ! पण आम्ही राजे आहोत –’

‘ मग ? आपल्या त्या राणीला काय वाटेल ? ’

‘ त्याची तू नको काळजी करू ! ’

‘ मी नाही काळजी करीत ! – पण तुम्ही तरी करायला हवी ना ? ’ असं म्हणून जसमा सरळ निघून गेली.

सिद्धराज चरफडला. हे पाखरू आपल्या पिंजऱ्यात येत नाही ? त्याच्या अहंकाराला धक्का बसला. जी गोष्ट मिळत नाही, हातातून निसटू पहाते, ती प्राप्त करून घेण्यासाठी माणूस अधिकच उत्सुक बनतो.

त्या दिवशी रात्री त्यानं महाअमात्य मुंजाल याला बोलावलं आणि म्हटलं, ‘ महाअमात्य, एका बाबतीत आम्हाला तुमचा सल्ला हवा आहे. ’

‘ बोला महाराज ! ’ मुंजालांनी नम्रतेनं म्हटलं.

‘ आम्हाला जसमा पसंत आहे. तिला राणी करावं, असं आम्हाला वाटतं. आमचं तिच्यावर प्रेम बसलं आहे. याबाबत काय करता येईल ? ’

‘ क्षमा करा, महाराज. माझं स्पष्ट मत असं आहे की, आपण चुकता आहात. ’

‘ महामंत्री – ’ सिद्धराज ओरडला.

‘ महाराज, आपल्या प्रत्येक कल्पनेला होकार देणं, हे माझं काम नाही. मंत्र्यानं योग्य सल्ला दिला पाहिजे. तो रुचला न रुचला तरी – ’

‘पण यात आमचं काय चुकतं आहे? राजा काय दोन-तीन विवाह करू शकत नाही?’

‘करू शकतो! पण विवाहित स्त्रीशी नाही –’

‘पण ती ओड जातीची आहे. तिच्या जातीत नवरा टाकून दुसरं लग्न करण्याची प्रथा आहेच –

‘बरोबर आहे. तसा तिनं स्वतःच निर्णय घेतला तर – आमचं काही म्हणणं नाही; पण तिची इच्छा नसताना –’

‘हो. तीच तर अडचण आहे. अजून ती आम्हाला वश होत नाही! आणि आता आम्ही तिच्याशिवाय राहू शकत नाही–’

‘महाराज, हा विकार आहे. हा विकार नाश करील आपला. तुम्हाला जाळील –’

‘होय महामंत्री! आम्ही जळत आहोत, त्यावर एकच उपाय आहे – जसमा! जसमा या सिद्धराजाची राणी व्हायला हवी! –आम्ही हेच स्वप्न आता दिनरात पहात आहो – आम्हा राजांना विरोध करण्याचं कुणाचं सामर्थ्य आहे?’

“राजे सांभाळा. महामंत्र्यानं आम्हाला पूर्वकल्पना दिली नाही, असा ठपका येऊ नये म्हणून स्पष्ट बोलतो – सत्तेच्या विरुद्ध सत्य सांगणं सोपं नसतं; पण परिणामांची तमा न बाळगता बोलणं भाग आहे. महाराज, सत्ताधीश, ही ‘व्यक्ती’ नसते! तो ‘समाज’ असतो. समाजाचं ते छोटं पण पूर्ण प्रतीक असतं! सत्ताधिशानं नीती-अनिती धाब्यावर बसविली तर समाजात ती

> येणार कुठून ? आणि सत्तेच्या जोरावर अनिती गाडता येईल, ही कल्पनाच चुकीची ! महाराज, अनिती गाडली गेली तर तिला अंकुर फुटतात, ही विषवल्ली सत्ताधिशाचा व समाजाचाही बळी घेते. आपण विकाराधीन होत आहा. या विकारातून क्रोध; क्रोधातून मोह, मोहातून बुद्धिभ्रंश, व बुद्धी भ्रष्ट झाली की सत्ता अन् समाज यांचा विनाश ! गीतेनं सांगितलेली ही अधःपतनाची दुष्ट परंपरा नेहमी विकारातूनच जन्माला येते."

'मुंजाल – उगीच भलत्या कल्पना लढवू नका ! आम्ही तुमच्या म्हणण्याचा विचार केला. शांतपणानं तुमचं म्हणणं ऐकलं. तुम्ही प्रामाणिकपणानं बोलत आहा म्हणून तुमचा राग नाही; पण तुमचं म्हणणं आम्हाला पटत नाही. प्रेम करणं हाच विकार असता तर प्रत्येक विवाहानं नरकच प्राप्त झाला असता. आम्हाला अनेक विवाह करण्याची धर्माची अनुज्ञा आहे.'

'पण सरकार –'

'महाअमात्य, आम्ही तुमच्याशी वाद घालू इच्छित नाही. जा तुम्ही !'

सिद्धराजानं मुंजालाना पाठवून दिलं. मुंजालाचा सल्ला त्याला पटला नाही. फक्त राजाच्या मनात एवढं आलं, 'काही तरी करून – किंवा कोणत्याही उपायानं तिचं मन वळवलं पाहिजे ! '

– पण ते वळलं नाही तर ?

– त्या बिचारीला राजवैभव ही काय चीज आहे, ते माहीत नाही म्हणून ! हे सारं वैभव आपलं होईल, हे ध्यानात आलं की, नक्की मन वळेल !

– तिला कसंही करून हे वैभव दाखवलं पाहिजे !

राजानं विचार केला ती राजवाड्यात येणार कशी ?. . .

. . . उचलून आणायची !

सुखाचा, वैभवाचा घोट बळेच पाजायचा. जिभेला गोडी कळली की कोण थुंकून टाकील ?

सिद्धराजानं त्या रात्री काही सैनिक पाठविले, त्रिकमची झोपडी जरा बाजूलाच होती. ते भररात्री तेथे गेले. त्रिकमच्या झोपडीत शिरले. त्या सैनिकांनी गुंगीच्या औषधाचा वास दोघांच्याही नाकाशी धरला. आणि जसमाला खांद्यावर घेतलं–

सिद्धराज वाट पहात होता. आपल्या राजमंदिरात फेऱ्या मारीत होता. जसमा आली.

सैनिक निघून गेल्यावर सिद्धराजानं तिच्या मुखावर गार पाण्याचे शिपके मारले, हळूहळू जसमानं डोळे उघडले. हळूहळू आजूबाजूच्या परिस्थितीचा अर्थ तिच्या ध्यानात यायला लागला. ती बावरली, घाबरली.

‘ तुम्ही ? – मी इथं कशी आले ? ’

‘ मीच आणलं ! तुला राजवाड्यात काय असतं हे पहायचं होतं ना ! म्हणून . . . चल. तुला इथलं सारं वैभव दाखवतो ! ’

सिद्धराज चालू लागला. जसमाच्या मनात काय होतं कुणास ठाऊक ! ती कसला विचार करीत होती ? पण ती संतापली किंचाळली नाही. ओरडली नाही. केवळ सचिंत झाली.

‘ घाबरू नकोस जसमा, तू एवढा मोठा वाडा कधी पाहिला नसशील ! चल तुला दाखवतो– ’ असं म्हणून राजानं तिला काही दालनातून नेलं. मोठमोठे आरसे, उंची वस्त्रं, हिऱ्या-मोत्यांचे अलंकार सारं दाखवलं ! जसमा केवळ त्याच्या पाठोपाठ कठपुतळीसारखी हलत होती.

नंतर राजा म्हणाला, ‘ जसमा, तू मनात आणशील तर या सर्व वैभवाची स्वामिनी होशील. ’

जसमा काही बोलली नाही.

‘ तुला त्रिकमची भीती वाटते का ? – की त्याच्याबद्दल प्रेम वाटतं ? – तू म्हणाली होतीस की, त्याचं प्रेम विसरता येत नाही. ठीक आहे. आपण असं करू– त्रिकमलाही वाड्यात आणू. तोही सुखात या वैभवात राहील. मग तर झालं ? ’

जसमा काही बोलली नाही.

‘ आहे ना राजवाड्यात काही विशेष ? त्या झोपडीत काय आहे ? तू मनात आणलंस की, हे सारं तुझं होईल. ’

‘ जसमा, मग काय तुझा विचार ठरला ना ? ’

‘ जी. ’

‘ वा ! फार छान ! – मला वाटलंच तुला आनंद होईल ! ’

‘ जी ! ’

सिद्धराज प्रफुल्लित झाला. म्हणाला, ‘ आम्हाला वाटलंच हे वैभव पाहिलं की, तुला आनंद होईल. तुझं आमच्याविषयीचं मन पालटेल. ’

‘ जी. माझ्या मनात येतंय – ’

‘ बोल. बोल. आम्ही तुझ्यासाठी काय वाटेल ते करू – ’

‘माझ्या मनात येतंय की, मी माहेरी आले. माहेरपण झालं की मग पिताजी, तुमच्या या कन्येला तिच्या घरी पोचवा –’

‘जसमा,’ राजा ओरडला. त्यानं तिच्या श्रीमुखात लगावली, ‘काय बकवार करतेस ? मी काय तुझ्या वडिलांसारखा आहे ? मी तरुण आहे. वृद्ध नाही –’

‘महाराज, आपलं वय महत्त्वाचं नाही. आपण राजे आहा! राजा हा प्रजेचा धर्मपिता असतो. मी आपली प्रजा आहे, तेव्हा आपण माझ्यावर वाईट नजर ठेवणं म्हणजे कन्येवर अत्याचार करणं आहे –’

‘जसमा,–’

‘अजूनही ही पशूसारखी वासना सोडावी. मनात येणं निराळं अन् मनावरचा ताबाच सुटणं निराळं !’

‘ही वासना आहे ? मग तुझा पती–’

> “कशाला जीभ विटाळता ? महाराज, आपण राजे आहा. माझा जीव घेऊ शकता ! पण त्या पवित्र पायांची सर तुम्हाला कदापि यायची नाही. तुम्ही सोन्यामोत्यात लोळत असला तरी वासनेचे किडे आहा ! तुम्हाला काय वाटलं की, मी तुमच्या वैभवाला भुलेन ? शीलाचा सौदा करून श्रीमंती विकत घेईन ? शक्य नाही ते. या राजवाड्यांचा आणि या हिऱ्या-मोत्यांचा मला मोह होईल ? महाराज, झोपडीचं वैभव तुम्हाला दिसलं नाही – तिथं काहीसुद्धा कमी नाही –”

घर टपकत, खटिरा टूट.

पियकी बाँह उसिसवा, सुखकी लूट !

" जसमा, नीट विचार कर, मीही तुला प्रेम देईन–त्रिकम काय जास्त देणार आहे ? "

' हूँ ! महाराज, वासनेत लोळणाऱ्याला प्रेम काय कळणार ? त्याची प्रेमाची कल्पना म्हणजे फक्त भोगशक्ती !' व जसमा कोणत्या तरी स्वप्नरंजनात रंगून जावी तशी बोलू लागली–

" त्या दिवशी काटा मोडला ना ? त्या दिवशी रात्री त्यांनी किती हळुवार काटा काढला. तीनतीनदा ते माझ्याकडे पहात होते. म्हणत होते, ' कही दुखता तो नही ? –नंतर ... नंतर आमचं खाजगी प्रेम सर्वांना सांगायचं का आहे ? ... पण त्यांनी माझ्या केसावरून हात फिरविला. मी झोपले. रात्री पाहिलं, तर ते उठून माझ्या डोक्यावरून हात फिरवीत होते. मी जागी झाले, त्यांनी मला म्हटलं, ' जसम, नींद आती है न ? कही पाँव जादा तो नहीं दुख रहा है ? –महाराज, मला झोप लागेल की नाही म्हणून काळजी करणाऱ्या माझ्या पतीच्या प्रेमाची ही आठवण मी कशी विसरू शकेन ? या हिऱ्या-मोत्यांच्या अलंकारांनी, या उंची वस्त्रांनी की या वैभवानं मी विसरू शकेन ? "

महाराज, एक दिवस आम्हाला मजुरी काही मिळाली नाही. लहानशी चांदकी केली होती. त्यांना मी वाढली. त्यांनी विचारलं होतं, ' तू नाही बसत जेवायला ? ' मी म्हटलं होतं, ' नंतर बसेन.' त्यांनी म्हटलं, ' छेः ! छेः ! ! आता बस.' तरी मी नाही म्हटलं, तेव्हा ते म्हणाले, ' जसम, बरतनं बताओ...' सारी भांडी रिकामी होती. त्रिकमचे डोळे पाण्यानं भरले.

म्हणाले, ‘ यह बात है ! चलो. कोई बात नहीं. दोनो मिलकर खाएंगे !’ आणि मला जेवायला लावलं. त्या दिवशी – त्या दिवशी, आम्ही उपाशी राहिलो होतो ? पण एक-एक घास आम्ही एकमेकांना भरवला होता –

महाराज, इथल्या पंचपक्वान्नांच्या लोभानं तो मधूर घास आणि उपवास मी विसरेन असं वाटतं आपल्याला ? जसमा सती आहे !

ती पतीच्या सुखाचाच विचार करते. स्वतःच्या सुखाचा नाही.

“ महाराज, हाच तुमच्यात व माझ्या पतीत फरक आहे. तुम्ही स्वतःच्या सुखासाठी, वासनातृप्तीसाठी, मला महालाचे वैभव दाखवीत आहा ? माझ्या पतीनं स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वतःला विसरल्यावाचून खरं प्रेम करता येत नाही. आणि स्वतःला विसरल्यावर वासना रहात नाही. पति-पत्नीचं प्रेम हे एकमेकांच्या सुखासाठी असतं. व वासना दुसऱ्याच्या सुखाचा यत्किंचितही विचार न करता आपलं सुख पहात असते. वासना-नरकाचं साधन ! आणि प्रीती–स्वर्गाचा गोड अनुभव ! महाराज अजूनही सावध व्हा आणि नरकाचे धनी होऊ नका ! ! ”

तेवढ्यात त्रिकम अन् त्याचे काही साथीदार बाहेर आले. मोठमोठ्यानं गर्जना ऐकू येऊ लागल्या – ‘ दरवाजा खोलो. दरवाजा खोलो. ’

राजानं ओळखलं की, गुंगी उतरल्यावर त्रिकमने शोध घेतला असेल, आणि त्याला आपला संशय येऊन तो नेमका आपल्या वाड्यावर साथीदारांसह आला आहे.

जसमा बाहेर पळत सुटली. सिद्धराजाला अपमान सहन झाला नाही. तो ओरडला, 'देखो, नतीजा ठीक न होगा!'

जसमा पळता-पळता थबकली हात उडवून म्हणाली,– 'अरे जा.'

त्रिकम निघून गेला. सकाळ होत आली होती. आता सिद्धराज महालात संतापानं फेऱ्या मारीत होता. काही वेळ गेला तोच बातमी येऊन धडकली की, त्रिकम अन् त्याचे साथीदार काम सोडून निघाले आहेत.

राजा लालबुंद झाला. झटकन् पाच-पन्नासांची सशस्त्र तुकडी घेऊन तो निघाला. त्यानं त्यांना आवराआवर करताना गाठलं आणि सरळ हल्ला चढवला.

मजूरही फावडी कुदळी घेऊन धावले.

पण सिद्धराजाचे होते सैनिक– व ते होते मजूर. त्रिकम पडला–

मजूर पळाले!

जसमा आपल्या पतीजवळ गेली. तिनं त्याचं शीर मांडीवर घेतलं. ती शोक करू लागली. सिद्धराज जवळ आला. म्हणाला, 'जसमा, झालं गेलं विसरून जा. त्रिकमला ठार करावं, असं मला वाटत नव्हतं; पण आता तुझा पती गेला आहे. होऊ नये ते झालं आहे. तुमच्या जातीत पाट लावतात. आता कुठंतरी मजुरी करीत वणवण भटकण्यापेक्षा–

' नहीं–नहीं–कदापि नहीं–' जसमा शोक करीत ओरडली, " मी सती आहे. मी तर आता जातेच; पण तुला शाप देते की, राजा, तुझ्या या तलावाला कधीहि पाणी लागणार नाही. व हे तुझं वर्तन तुझ्या चारित्र्यावरचा कायमचा कलंक बनून राहील. "

जसमाच्या देहाची राख होऊन पडली. राजानं सुन्नपणानं ते पाहिलं.

मुंजाल तिथं आला. त्यानं म्हटलं, ' महाराज, पतीचं प्रेम हाच शृंगार. धर्माला अविरोधी काम हेच प्रभूचं रूप. पण वासना हाच शत्रू ? शृंगार आणि काम यातला फरक आपण ओळखायला हवा होता ! ...'

सिद्धराज काही बोलला नाही.

ते सहस्रलिंग तळे अजूनही कोरडे आहे.

– तिथं आजही सती जसमाचं मंदिर आहे. ही पाटण नगरीची कहाणी. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी संपूर्ण झाली आहे–पण सुफळ होणार का ?

IRBK-0116108

म. ग्रं.
वा. क्र. ... नों. दि. ...
वि. ...